# <u>अधिसुचना</u>

क्र/उजिभूक्र.२/ मं.अ. /कावि -      /२०१९
उपजिल्हाधिकारी  भूसंपादन क्र.२
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर
दिनांक -     /११/२०१९

भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३. अन्वये कलम १९(१) खालील अधिसुचना.

ज्याअर्थी समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्हयाच्या अधिका-याने भुमिसंपादन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३(२०१३ चा ३०) (यात या पुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसुचना **क्रमांक/उजिभु/मं.अं./कावि-८३/२०१९** अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसुचि एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसुची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा तिची आवयश्कता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्हाधिका-याने कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे. म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसुची तिन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतिच्या प्रयोजनासाठी "पुर्वसन क्षेत्र"  म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असुन, पुनर्वसन याेजनेचा सारांश अनुसुची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-याची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र. २ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसुची — १**

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

**भु.सं.प्र.क्र. १९/अ-६५/२०१८-१९ मौजा : मेढा, तह.भिवापुर, जिल्हा नागपूर**

| अ.क्र. | जमिन मालकाचे नांव | गट क्रमांक | क्षेत्रफळ (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | अमृत मोतीराम कानफाडे, गंगुबाई शामराव तिखट, बेबी जनार्धन मोडक | १३ | ०.०३ |
| २ | गया मारोती ठाकरे, श्रावण मारोती ठाकरे, इंदिरा मारोती ठाकरे, मुक्ता मारोती ठाकरे, गोकुल माणिकराव जगताप, राजेश्वर माणिकराव जगताप, श्रीराम ज्ञानेश्वर जगताप, संजय ज्ञानेश्वर जगताप, गीता सुधाकर वानखेडे, विमल ज्ञानेश्वर जगताप, दिलीप नामदेवराव मोहोड, अंजनाबाई झिबल इंगोले, सुरेश झिबल इंगोले, चंद्रकांत झिबल इंगोले, रत्नमाला विजय महल्ले, वंदना कृष्णाजी शिंगणे, चंद्रकला कैलास गुडधे, माधुरी सुर्यभान वैद्य, चंद्रभान कवडु चौधरी, रंगलाल कवडु चौधरी, गिता संभाजी तुरक, अनुसयाबाई कवडूजी चौधरी | ३०३ | ०.२८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रावण पांढुरंग मोहोड, सुखदेव इश्वर मोहोड, बेबीताई वसंतराव बाहे, छायाताई प्रभाकर बिरे, सिंधुताई प्रभाकर व-हाडे, पार्वता ईश्वर मोहोड, रोहित दिपक मोहोड, वृशाली दिपक मोाहोड अ.पा.क. आई जोत्सना दिपक मोहोड | ३१२ | ०.२१ |
| | एकुण | | **०.५२** |

**अनुसुची – दोन**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : गोसीखुर्द प्रकल्प

प्रकल्पाचे कामाचे विवरण : मोखाबर्डी उपससिंचन योजनेअंतर्गत मेढा वितरीकेचा लघु कालव्यावरील उजवा-१ मी. वरील मेढा उपलघुकालवाच्या बांधकामाकरीता.

प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे : गोसीखुर्द प्रकल्पामुळे सिंचन क्षमता २५०८१९ हे.आर. आहे. (आर्थिक,रोजगार,पायाभुत,सुविधा व इतर) त्याचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंदे व शेतजमिनीला होणार आहे.

**अनुसुची – तिन**

पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन

संपादनामुळे भुधारक विस्थापित होत नाही : निरंक

**अनुसुची – चार**

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

१) कार्यकारी अभियंता,आंभोरा उपसासिंचन विभाग,भिवापुर यांचेकडील पत्र जा.क्र.९८६/चिशा/भुसंपादन/२०१९. दिनांक.१८/०३/२०१९.

२) महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग शासन निर्णय क्र.जि.ओ.एस. – १०८१/(२३/१असंज,२ मंत्रालय, मुबंई) दिनांक ३१/०३/१९८३.

संपादनामुळे भुधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९८६ व तदनंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

टिप : उक्त जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र.२ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

ठिकाण : नागपूर

दिनांक : / ११/२०१९

**उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र.२**
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.**